दिनांक : २३/१०/२०२३

# प्रेस नोट

दिनांक २४/१०/२०२३ रोजी बृहन्मुंबई शहरामध्ये आझाद मैदान व शिवाजीपार्क येथील दसरा मेळावा, देवी विसर्जन, विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचा वानखेडे स्टेडियम येथील सामना तसेच कायदा व सुव्यवस्था राखणेकामी इतर बंदोबस्त याकरीता मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली मा. पोलीस सह आयुक्त (का. व सु.), मुंबई ह्यांचे देखरेखीखाली बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आलेले आहे.

मुंबई पोलीस दलाकडून ६ अपर पोलीस आयुक्त, १६ पोलीस उप आयुक्त, ४५ सहायक पोलीस आयुक्त यांच्यासह २४९३ पोलीस अधिकारी व १२४४९ पोलीस अंमलदार बंदोबस्तकामी तैनात करण्यात आलेले आहेत. त्यांचेसोबत महत्वाच्या ठिकाणी ३३ एस.आर. पी.एफ. प्लाटून, QRT Teams, होमगार्डस् अशा चोख पोलीस बंदोबस्ताचे आयोजन करण्यात आलेले आहे.

०-०-०